# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प )

---

## मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ONDC क्यूआर तिकीट, NCMC आंतर-कार्यक्षमता कार्ड यांचा शुभारंभ आणि सीसीटीव्ही व्हिडिओ ॲनालिटिक्स हॅकथॉन विजेत्यांच्या सत्कार




आज दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी गणेश कलाक्रीडा येथे पुणे मेट्रोच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स (ONDC) द्वारे क्यूआर तिकीट प्रणाली, नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) आंतर-कार्यक्षमता (Interoperability) आणि सीसीटीव्ही व्हिडिओ ॲनालिटिक्स (VA) हॅकथॉनच्या विजेत्यांचा सत्कार समारंभ यांचा समावेश होता. या सर्व उपक्रमांचे

उद्घाटन/शुभारंभ  आणि विजेत्यांचा सन्मान मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. मा. पंतप्रधान यांच्या 'वन कार्ड, वन ट्रॅव्हल, वन नेशन' या संकल्पनेच्या प्रती आणि पुणे मेट्रोच्या प्रवाशांना अत्याधुनिक, सुरक्षित आणि डिजिटल सेवा पुरवण्याच्या पुणे मेट्रोच्या वचनबद्धतेतील एक महत्त्वाचे पाऊल आहे.

या महत्त्वाच्या कार्यक्रमाला मा. मुरलीधर मोहोळ (केंद्रीय राज्यमंत्री तथा पुणे लोकसभा सदस्य), मा. अजित पवार (उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे), मा. चंद्रकांत पाटील (उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री), निलम गोऱ्हे (विधान परिषदेच्या उपसभापती) मा. माधुरी मिसाळ (राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा आमदार, पर्वती विधानसभा), अण्णा बनसोडे (उपसभापती विधानसभा), मा. हेमंत रासने (आमदार, कसबा विधानसभा), इतर मान्यवर आमदार आणि महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर , पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे सार्वजनिक वाहतुकीच्या आधुनिकीकरणासाठी शासनाची आणि स्थानिक प्रतिनिधींची कटिबद्धता अधोरेखित झाली.

या कार्यक्रमामध्ये डिजिटल कॉमर्ससाठी ओपन नेटवर्क (ONDC) वर पुणे मेट्रोची नोंदणी समाविष्ट झाली आहे, ज्यामुळे पुणे मेट्रो भारतातील अग्रगण्य ट्रान्झिट एजन्सीपैकी एक बनली आहे. ONDC प्लॅटफॉर्ममुळे प्रवाशांना विविध खरेदीदार ॲप्लिकेशन्सद्वारे पुणे मेट्रोचे तिकीट काढण्याचा स्मार्ट, सरळ आणि डिजिटल पर्याय उपलब्ध झाला असून, यामुळे मेट्रोचे तिकीट काढण्याचा वेळ कमी होऊन अखंड प्रवास अनुभव मिळतो. याव्यतिरिक्त, पुणे मेट्रोमध्ये NCMC आंतर-कार्यक्षमता प्रणाली कार्डदेखील सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना आता प्रवासासाठी पुणे मेट्रो-एचडीएफसी बँक को-ब्रँडेड कार्डाव्यतिरिक्त देशातील कोणतेही NCMC- प्रणाली समर्थित कार्ड वापरण्याची सोय मिळणार आहे, ज्यामुळे राष्ट्रीय गतिशीलता मानकांशी जुळणारी एक आधुनिक सार्वजनिक वाहतूक प्रणाली सक्षम होईल.

सुरक्षिततेच्या दृष्टीने, सीसीटीव्ही व्हिडिओ ॲनालिटिक्स (VA) हॅकथॉन अत्यंत महत्त्वाचा ठरला. या हॅकथॉनच्या माध्यमातून मेट्रो रेल्वे-केंद्रित VA क्षमतांची पूर्तता करण्यासाठी सक्षम भागीदारांचा शोध घेण्यात आला. या प्रणालीमुळे प्लॅटफॉर्मवर पडणे, तिकीट रांगेतील गर्दी, झटापट आणि सोडलेली वस्तू यांसारख्या घटनांसाठी एआय-आधारित रिअल-टाईम मॉनिटरिंग शक्य होईल. या हॅकथॉनमध्ये, मेटाफ्युजन (Metafusion) ला “विजेता” घोषित करण्यात आले आहे, तर वनिरिक्स लॅब (Oneirix Lab) आणि सिट्रियॉट (Citriot) यांना अनुक्रमे प्रथम उपविजेता आणि द्वितीय उपविजेता म्हणून घोषित करून प्रत्येकी ₹ २ लाख रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे मेट्रोमध्ये लवकरच मेटाफ्युजनचे VA समाधान लागू करण्यात येणार आहे.